Date: 05th August 2026

To,

BSE Limited
Phiroze Jeejeebhoy Towers,
Dalal Street, Mumbai - 400001

Scrip Code: 523025

National Stock Exchange of India Limited
Exchange Plaza, Plot No. C/1, Block G, Bandra
Kurla Complex, Bandra (East), Mumbai 400051

Scrip Symbol: SAFARI

Sub.: **Intimation regarding publication of unaudited financial results for the quarter ended June 30, 2026**

Ref: **Regulation 47 and 30 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015**

Dear Sir,

Pursuant to Regulation 47 read with Regulation 30 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, enclosed herewith are copies of newspaper advertisement published on Wednesday, 5th August 2026 in Business Standard (English) and Sakal (Marathi) regarding Unaudited Financial Results for the quarter ended 30th June 2026.

The aforesaid disclosure will also be disclosed on the website of the Company at www.safaribags.com.

You are requested to kindly take the same on record.

Yours faithfully,

For **Safari Industries (India) Limited**

ABHIJAAT AKHILESH SINHA
Digitally signed by ABHIJAAT AKHILESH SINHA
Date: 2026.08.05 18:13:52 +05'30'

Abhijaat Sinha
Company Secretary & Legal Head

‘1991 marked a paradigm shift in industrial, fiscal and trade policy’

35 years of liberalisation

FROM PAGE 1



“It’s remarkable that (Manmohan) Singh got attacked in 1991 both from the Left and the Right, but the design that he put in place has stood the test of time for 35 years”

Jairam Ramesh had a ringside view of the reforms in 1991 as an officer on special duty in the PMO PHOTO: REUTERS

Are you suggesting that there are some parallels to the situation today?

■ No, because in 1991, it was a crisis of unprecedented proportions. Manmohan Singh was very adamant, and very clear that India would not default.

Some people have argued that India did not adequately focus on manufacturing then.

■ That’s absolutely not true, because the entire licencing system was abolished. Entrepreneurs were free to invest wherever they wanted to, locate wherever they wanted to. Capital markets also got a big boost.

In any case, the concept of the government investing didn’t exist after 1991. It is enterprises and entrepreneurs that have to invest. However, what happened was the software boom just took over in the 1990s. Big global majors, software users discovered India as a source of competitive, low-cost but highly skilled manpower, and that’s how the entire information technology revolution happened.

In your book on the 1991 reforms, *To the Brink and Back: India’s 1991 Story*, you have written that the subsequent Budgets of Singh were not particularly reformist?

■ The 1991 Budget was, of course, revolutionary. The next one built on it, and so did the one after that. But from 1994, the Congress launched campaigns for state assembly elections, and in 1995, we were looking at the 1996 Lok Sabha elections. So, I wouldn’t call the Budgets of those years revolutionary.

It’s remarkable that Singh got attacked in 1991 both from the left and the right, but the design that he put in place has stood the test of time for 35 years. There is this famous interview that K N Raj, the guru of Indian economics, gave *Frontline* magazine in August 1991, where he agreed with Singh’s assessment and said it should be supported.

From the right, Vajpayee was attacking him but with a smile. Vajpayee told Singh later and asked him not to feel too bad about the political attacks.

Singh and Rao had at least two meetings with leaders of the opposition parties; Singh reached out to trade unions, to intellectuals. At that time the dominant intellectual ecosystem was that of the Left.

In analysing the success of the 1991 reforms, it’s not just the ‘what’, but the ‘who’ is very important. Neither Rao nor Singh was a hardcore socialist. They came from the soft socialist tradition. Singh was not a market*wallah* in the 1970s and 1980s. Rao certainly was not. Singh was pragmatic.

There was a Congress Parliamentary Party meeting after Singh presented his Budget on July 24, 1991. The two who supported him very strongly, surprisingly, were Mani Shankar Aiyar and Nathuram Mirdha. They met for three days and concluded that it was inevitable and long overdue — they felt that Rajiv Gandhi would have done it had he come back (Rajiv Gandhi was assassinated during the Lok Sabha campaigning in May 1991).

We had a good team. Commerce Secretary Montek Singh Ahluwalia, Rakesh Mohan, Amarnath Verma, who was basically the bureaucratic *sutradhar* (coordinator), and Naresh Chandra, the cabinet secretary. Manmohan Singh had been the chief economic advisor and economic affairs secretary so he basically knew everything in finance. In commerce, he depended entirely on P Chidambaram and Montek. And on industry, there was Rakesh and there was Verma, who had been industry secretary, and he moved over as principal secretary to the PM. These were people who knew those measures for almost four to five years and had discussed it. It was not a black box. There was V P Singh’s Budget, then Rajiv Gandhi continued with it when Singh left. Then when V P Singh became prime minister and there was the ‘M’ paper, the Montek paper. What ’91 did was bring it all together in three paradigms — the fiscal, industry and trade paradigms.

Why did the government opt to go in for a two-step devaluation?

■ Manmohan Singh and C Rangarajan (the then deputy governor of RBI) wanted to do it in two steps. They wanted to first test the market and then go in for the second step. Rao wanted to do it in just one *jhatka* (jolt), be done with it. But they did it in two steps. Once they did the first devaluation, there were a lot of political attacks. Rao became defensive and so he tried to stall and called on Singh to stall the second devaluation. But by then Singh had spoken to Rangarajan, who had already announced it. So, he told Rao, it’s already been done. That was hilarious.

In fact, 1991 showed to me the value not only of formal institutional relationships but the informal ones too. Singh and Rangarajan, Singh and Montek, Singh and Chidambaram... Chidambaram was given commerce at that time.

There was a team, there was camaraderie... all of us were young, in our 30s and 40s, barring Singh. Manmohan Singh would pick up the phone and talk to people in a spirit of free discussion. In the finance ministry, the Secretary was S P Shukla, who was not in favour of the reforms. Chief Economic Advisor Deepak Nayyar was not in favour, neither was Foreign Secretary Muchkund Dubey. But Singh took them along.

Looking at the current situation, what more do you think needs to be done?

■ Today, the biggest paradox, according to me, is official data shows that we are growing at more than 7 per cent, but private corporate investment sentiment is subdued. The growth rate would have been worse had public investment not picked up the slack. So, it is paradoxical that PM Modi, who is very critical of the *ancien regime*, which was based on public investment, has had to depend on the same public investment to give him the growth rate that he is claiming credit for.

Now, I don’t want to get into the debate on the veracity of economic growth data. That is a separate issue. But it’s inexplicable to me that you can grow at 7 per cent with these rates of private investment. The central challenge in 1991 was not how to stimulate private investment, it was how we get our foreign exchange problem sorted. That problem is there today as well, but facing pressure on capital inflows when your forex reserves is $900 million and now when it is $690 billion is a completely different ballgame.

How to stimulate private investment has become the single most important element of any reform agenda today. It is completely puzzling to me that we are reporting such healthy growth rates with such low levels of investment. There is a lot of investment taking place, but it is the rate of investment that we are talking about. The short-term challenge is also that we have seen capital outflows, both FDI as well as on foreign portfolio investment, even before the current Iran war. Plus, the rupee and capital account have come under pressure. So, we have to shore up our dollar earnings by anywhere between $30 billion and $50 billion. I am glad that Modi has rediscovered the value of what the Singh government did in 2013, when Raghuram Rajan was the Reserve Bank of India governor, by introducing Foreign Currency Non-Resident (Bank) accounts.

Between now and September they are hoping to mobilise $50 billion. But I think that’s only a band-aid. The real issue is you have to get private investment to somewhere between, 35 to 36 per cent of the GDP. It is hovering about 30-31 per cent.

Now, why is that not happening? Well, I would say demand is not sufficient enough because real wages have stagnated over the past decade. I think the Indian market has got sharply cleaved because inequalities have gone up. The mass market has not increased, but niche markets have, and investors will invest when they see an uptick in the mass market. As you know, Singh was very fond of quoting John Maynard Keynes, that investment is as much a psychological decision as a financial one. Now, the question that PM Modi has to ask is whether the psychological factor is conducive for investment.

Paradoxically, I think, in the past 10 years, while you had the goods and services tax (GST), digitalisation and so on, the power of tax authorities and investigative agencies has increased manifold. This is not to justify corporate malfeasance. But I would say the extraordinary powers given to the tax authorities, the feeling of uncertainty, the feeling of intimidation... There is a growing sense in Indian business that there are certain areas in which there are oligopolies to an extent that was unimaginable 20 or 35 years ago. One thing that was done in 1991 was to abolish the Monopolies and Restrictive Trade Practices Act, which aimed to control the growth of monopoly power. But the philosophy of 1991 was we will control the abuse of monopoly power, not growth.

Today, whether you look at ports, airports, or cement, you are basically seeing one or two players [dominate]. Finally, you cannot run from the $115 billion trade deficit with China. This has knocked the bottom out. No matter what we have done, we have not been able to control imports from China. Now, some imports from China result in exports — such as phone components and chips — but not all imports are in that category. The Chief Economic Advisor has written about this. So, it’s not as if they don’t know. I don’t think the tax rate is the issues anymore; in September 2019, the government brought down corporate tax rates. Today, personal income tax exceeds corporation tax collections.

आक्रमक मानसिकतेमुळे जडेजा परिपूर्ण गोलंदाज

नवी दिल्ली : रवींद्र जडेजा सुरुवातीला बचावात्मक गोलंदाज होता; परंतु त्याने मानसिकता बदलली आणि तो आक्रमक शैलीचा गोलंदाज झाला. यामुळेच तो कसोटी क्रिकेटमध्ये परिपूर्ण गोलंदाज झाला आहे, असे मत माजी फलंदाज चेतेश्वर पुजाराने व्यक्त केले आहे.

फास्ट न्यूज

पाकिस्तानी बॉक्सर ग्लासगोतून फरार

कराची : पाकिस्तान बॉक्सिंग फेडरेशन पुन्हा एकदा अडचणीत आले आहे. ग्लासगोतील राष्ट्रकुल स्पर्धा संपताच पाकचा बॉक्सर कुदरतुल्ला संघाच्या हॉटेलमधून फरार झाला आहे. पाकिस्तान बॉक्सिंग फेडरेशनसाठी ही प्रथमच घडलेली घटना नाही. परदेशातील कोणत्याही बहुराष्ट्रीय स्पर्धा संपताच त्यांचे खेळाडू परत पाकिस्तानमध्ये परतायचे नसल्यामुळे अशा प्रकारे फरार होत असतात.

चेन्नई ओपन टेनिस स्पर्धेसाठी सहाय्य

चेन्नई : तमिळनाडू सरकारकडून चेन्नई ओपन या डब्ल्यूटीए २५० टेनिस स्पर्धेसाठी १० कोटींचे सहाय्य करण्यात आले आहे. यामुळे आता सलग दुसऱ्या वर्षी या स्पर्धेच्या आयोजनाचा मार्ग मोकळा झाला आहे. तमिळनाडू टेनिस संघटनेचे अध्यक्ष विजय अमृतराज, क्रीडामंत्री आधव अर्जुन, तमिळनाडू क्रीडा विकास समितीचे पदाधिकारी यांच्यामध्ये चेन्नई ओपन या टेनिस स्पर्धेच्या आयोजनासाठी चर्चा करण्यात आली. या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी २० कोटींची आवश्यकता होती.





राष्ट्रकुल स्पर्धेत पदकविजेती कामगिरी करून मायदेशी परतणारे बॉक्सर अंकुश पंघाल, प्रीती पवार आणि साक्षी चौधरी यांच्यासह महाराष्ट्राचा पॅरा ॲथलीट दिलीप गावितचे जंगी स्वागत करण्यात आले.

पदकविजेत्यांचे जंगी स्वागत

राष्ट्रकुलमधील दमदार यशानंतर खेळाडू आशियाई स्पर्धेसाठी सज्ज

नवी दिल्ली, ता. ४ : राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेमध्ये पदकांवर मोहर उमटवणाऱ्या भारतीय बॉक्सर, ज्युडो व पॅरा खेळाडूंचे मायदेशात जंगी स्वागत करण्यात आले. यासाठी इंदिरा गांधी विमानतळावर शेकडो क्रीडाप्रेमींच्या उपस्थितीत ढोल-ताशांच्या गजरात त्यांचे ग्रँड वेलकम करण्यात आले. या वेळी राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत पदक पटकावल्याचे मिशन पूर्ण झाल्यानंतर भारतीय खेळाडूंनी यावर्षी ४ सप्टेंबर ते ११ ऑक्टोबर यादरम्यान खेळवण्यात येत असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेमध्ये पदक पटकावण्याचे लक्ष्य डोळ्यांसमोर ठेवले आहे.

महाराष्ट्राच्या दिलीप गावित याने पुरुषांच्या १०० मीटर टी४७ (पॅरा) या शर्यतीत सुवर्णपदक पटकावत इतिहास रचला. जंगी स्वागतानंतर तो म्हणाला की, राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेमध्ये मी पहिल्यांदाच १०० मीटर धावण्याच्या शर्यतीत सहभागी झालो होतो. या शर्यतीत विक्रमी कामगिरी केली. याचा आनंद आहे. वातावरण खडतर होते, मात्र आम्ही वातावरणाशी जुळवून घेत छान कामगिरी केली. आता मला पॅरालिंपिकमध्ये सुवर्णपदक पटकवायचे आहे.

स्वप्नपूर्ती : साक्षी चौधरी

- महिलांच्या ५१ किलो वजनी गटात सुवर्णपदक पटकावलेली साक्षी चौधरी हिने राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदक म्हणजे स्वप्नपूर्ती झाल्याचे मत व्यक्त केले. साक्षी चौधरी हिने राष्ट्रकुल क्रीडा महोत्सवात इंग्लंडच्या रुबी व्हाईट हिला पराभूत केले.
- इंग्लंडच्या खेळाडूला आंतरराष्ट्रीय स्तरावर पराभूत करणारी साक्षी चौधरी ही पहिलीच खेळाडू ठरली आहे. साक्षी चौधरी हिने आवर्जून नमूद केले की, राष्ट्रकुलमधील पदक म्हणजे माझी स्वप्नपूर्ती झाल्यासारखेच आहे.
- दर रात्री मी हेच स्वप्न बघत होती. आता अशा प्रकारची कामगिरी आशियाई क्रीडा स्पर्धेतही करावयाची आहे. सातत्यपूर्ण प्रदर्शनासाठी मी प्रयत्न करीत राहणार आहे.

तीन आठवड्यांचा सराव

- जास्मिन लाम्बोरिया हिने महिलांच्या ५७ किलो वजनी गटात सुवर्णपदक पटकावले. आता तिला लॉस एंजेलिस ऑलिंपिकमध्ये पदक पटकावण्याचा ध्यास लागून राहिला आहे.
- ती म्हणते की, मी आजारी होते. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेच्या तीन आठवडे आधी मी सरावाला सुरुवात केली, मात्र रिंगमध्ये उतरल्यानंतर मी फक्त सर्वोत्तम कामगिरी करण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये यशही मिळाले. आता आशियाई स्पर्धेसह लॉस एंजेलिस ऑलिंपिकमध्ये पदक पटकावण्याचे स्वप्न बाळगले आहे.

हॉकी जर्सी रंगबदलाचा वाद आता अधिक तीव्र

नवी दिल्ली, ता. ४ (पीटीआय) : भारतीय हॉकी संघाच्या जर्सीच्या रंगबदलावरून हॉकी इंडियामधील वाद मंगळवारी आणखी तीव्र झाला. महासंचालक कमांडर आर. के. श्रीवास्तव यांनी या निर्णयासंदर्भातील कागदपत्रे सादर करण्यासाठी अध्यक्ष दिलीप तिर्की यांनी दिलेली मुदत पाळली नाही. दरम्यान, सचिवपदाचे भोलानाथ सिंग यांनी कार्यकारी मंडळाची तातडीची बैठक बोलावण्याची मागणी केली.

सलग दुसऱ्या दिवशी श्रीवास्तव यांना पाठवलेल्या कडक शब्दातील ईमेलमध्ये तिर्की यांनी संध्याकाळी ५ वाजेपर्यंत या निर्णयासंदर्भातील सर्व पूरक कागदपत्रे सादर करण्याचे निर्देश दिले. कार्यकारी संचालकांनी कार्यकारी मंडळासमोर स्पष्टीकरण दिले असले, तरी त्याआधी दिलेल्या सूचना मागे घेण्यात आलेल्या नाहीत, असे त्यांनी स्पष्ट केले.

हॉकी इंडियाच्या जर्सीचा भगवा रंग केल्यानंतर दोन्ही बाजूंनी ईमेल करून वेगवेगळे मुद्दे उपस्थित केले जात आहेत. या सर्व मुद्यांवर कार्यकारी मंडळाच्या बैठकीत चर्चा करणे गरजेचे आहे. त्यासाठी ही बैठक नियोजित करण्याची गरज असल्याचे भोलानाथ सिंग यांनी म्हटले आहे.

नेदरलँड्स आणि बेल्जियममध्ये येत्या १५ तारखेपासून विश्वकरंडक हॉकी स्पर्धा सुरू होत आहे. त्यामुळे जर्सी रंगबदलाचा हा मुद्दा ताणला गेला आहे.

भारताचे माजी हॉकी कर्णधार विरेन रस्किन्हा, अजित पाल सिंग, धनराज पिल्ले, परगट सिंग यांनी थेटपणे रंगबदलास विरोध दर्शविला. अनेक दशकांपासून असलेला पारंपरिक निळा रंग बदलण्याची गरजच काय होती, असा प्रश्न या सर्वांनी उपस्थित केलेला आहे.

हॉकीचे टर्फ निळ्या रंगाचे असते म्हणून आम्ही हा रंगबदल केला आहे, असे समर्थन हॉकी इंडियाकडून करण्यात आले आहे. हा निर्णय अध्यक्ष किंवा कार्यकारी मंडळाची मान्यता न घेताच घेण्यात आल्याचे तिर्की यांचे म्हणणे आहे.

जर्सीचा मुद्दा हा तिर्की यांनी महासंचालकांकडे स्पष्टीकरण मागितलेल्या विषयांपैकी एकमेव विषय नाही. सोमवारी पाठवलेल्या आणखी एका ईमेलमध्ये तिर्की यांनी हॉकी इंडियातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याविरोधातील छळ आणि गैरवर्तनाच्या तक्रारींशी संबंधित चौकशी अहवालाची संपूर्ण प्रत मागितली.

विश्वासात न घेता निर्णयाची बजावणी

हॉकी जर्सीचा रंग अचानक का बदलण्यात आला, त्याचे स्पष्टीकरण देण्याची मागणी करणारा ईमेल तिर्की यांनी सोमवारी श्रीवास्तव यांना पाठवला होता. आठवड्यातील हा त्यांचा दुसरा ईमेल होता. रंग बदलाचा हा महत्त्वपूर्ण निर्णय घेताना संबंधितांनी हॉकी इंडियाला विश्वासात घेतले नाही, असे तिर्की वारंवार म्हणत आहेत.

नीरजसमोर पुन्हा पथिरागेचे आव्हान

राष्ट्रकुलमधील पाच खेळाडूंचा डायमंड लीगमध्ये सहभाग

नवी दिल्ली, ता. ४ (पीटीआय) : ऑलिंपिक असो वा राष्ट्रकुल सुवर्णपदकापासून दूर राहत असलेल्या नीरज चोप्राच्या प्रतिस्पर्ध्यांमध्ये आता श्रीलंकेच्या रुमेश पथिरागे याची वाढ झाली आहे. याच रुमेशचे पुन्हा एकदा आव्हान नीरज चोप्रासमोर असणार आहे. २१ ऑगस्ट रोजी होत असलेल्या लौसाने डायमंड लीगमध्ये नीरजसह रुमेशही सहभागी होत आहे.

ग्लासगो येथे नुकत्याच झालेल्या राष्ट्रकुल स्पर्धेत नीरजपेक्षा सरस कामगिरी करून रुमेशने सुवर्णपदक जिंकले. त्यामुळे नीरजला पुन्हा एकदा रौप्यपदकावर समाधान मानण्याची वेळ आली. हे रौप्यपदक मिळवताना नीरजने त्याची यंदाच्या मोसमातील ८५.८३ मीटर ही सर्वोत्तम कामगिरी केली; परंतु ती सुवर्णपदकासाठी पुरेशी ठरली नाही.

राष्ट्रकुल स्पर्धेत सहभागी झालेले एकूण पाच प्रतिस्पर्धी लौसाने येथील डायमंड लीगमध्ये खेळणार आहेत. त्यात ऑलिंपिक विजेता पाकिस्तानचा अर्शद नदीम, विद्यमान विश्वविजेता त्रिनिनादचा केशॉर्न वॉलकॉट, माजी विश्वविजेता ग्रेनेडाचा अँडरसन पीटर्स आणि माजी ऑलिंपिक विजेता जर्मनीचा थॉमस रोहर्लर आणि रुमेश पथिरागे यांचा समावेश आहे.

याव्यतिरिक्त टोकियो ऑलिंपिकमध्ये रौप्यपदक मिळवणारा चेक प्रजासत्ताकचा जेकब वाल्देच, जर्मनीचा ज्युलियन वेबर, स्वीत्झर्लंडचा सिमॉन वेलँड आणि अमेरिकेचा कर्टिस थॉमसन हेसुद्धा स्पर्धा करणार आहेत.

गेल्या चार ऑलिंपिक आणि विश्व अजिंक्यपद स्पर्धेत विजेतेपद मिळवणारे असे पाच सुपरस्टार भालाफेकपटू सहभागी होत असल्यामुळे ही डायमंड लीग स्पर्धा कमालीची चुरशीची होईल, असे संयोजकांचे म्हणणे आहे.

गेल्या सप्टेंबरमध्ये कंबरेच्या दुखापतीनंतर पुनरागमन करणाऱ्या नीरज चोप्राची ही तिसरी स्पर्धा असेल. जून महिन्यात झालेल्या दोहा लीगमध्ये नीरजने ८५.६९ मीटर लांब भाला फेकला होता. राष्ट्रकुल स्पर्धेत त्याने ८५.८३ अशी माफक सुधारणा केली; पण लौसाने डायमंड लीगमध्ये सुवर्णपदक मिळवायचे असेल तर नीरजला किमान ९० मीटरचे टार्गेट ठेवावे लागेल.

नीरज चोप्रा

श्रीलंकन खेळाडूला अधिक संधी?

राष्ट्रकुल स्पर्धेत सुवर्णपदक जिंकताना श्रीलंकेच्या पथिरागेने ८९.७५ मीटर अशी कामगिरी केली होती, त्यामुळे लौसानेमध्येही त्याला अधिक संधी असल्याचे बोलले जात आहे. ९२.६२ मीटर ही त्याची वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरी आहे. जून महिन्यात रोम येथे झालेल्या गोल्डन गाला स्पर्धेत त्याने लांब भाला फेकला होता. यंदाच्या मोसमात ९० मीटर कामगिरी करणारा तो एकमेव भालाफेकपटू आहे.

मानांकनात भारताची घसरण

जागतिक स्पर्धा : सिंधू नवव्या स्थानावर

नवी दिल्ली, ता. ४ : भारतातील इंदिरा गांधी स्टेडियममध्ये १७ ते २३ ऑगस्टदरम्यान जागतिक बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धा खेळवण्यात येणार आहे. या प्रतिष्ठेच्या स्पर्धेतील मानांकन यादी मंगळवारी जाहीर करण्यात आली. यजमान भारत देशातील खेळाडूंच्या मानांकनात कमालीची घसरण झाली आहे. दुहेरी ऑलिंपिक पदक विजेती पी. व्ही. सिंधू हिला महिला एकेरीत नववे मानांकन देण्यात आले आहे. तसेच आशियाई क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदक विजेता सात्त्विक साईराज रंकीरेड्डी व चिराग शेट्टी या पुरुष दुहेरीतील जोडीला पाचवे मानांकन देण्यात आले आहे.

जागतिक बॅडमिंटन स्पर्धेमध्ये ब्रॉंझपदक पटकावलेल्या लक्ष्य सेन याला पुरुष एकेरीत १४वे मानांकन देण्यात आले आहे. ध्रुव कपिला व तनीषा क्रॅस्टो या जोडीला मिश्र दुहेरीमध्ये १५वे मानांकन देण्यात आले आहे. या स्पर्धेसाठी खेळाडूंची पात्रता ही २८ एप्रिल २०२६ पर्यंतच्या जागतिक क्रमवारीवर ठरवण्यात आली आहे. तसेच जुलै २०२६ पर्यंतच्या जागतिक क्रमवारीनुसार त्यांना मानांकन देण्यात आले आहे.

पी. व्ही. सिंधू

ड्रॉ आज जाहीर होणार

या स्पर्धेचा ड्रॉ उद्या (ता. ५) जाहीर होणार आहे. एखाद्या मानांकित खेळाडूने माघार घेतल्यास अंतिम मानांकन यादीमध्ये बदल होऊ शकतो.

युकी, यंग पहिल्या स्थानी

पुरुष एकेरीमध्ये चीनचा विश्वविजेता खेळाडू शी युकी याला प्रथम मानांकन देण्यात आले आहे. तसेच महिला एकेरीमध्ये दक्षिण कोरियाची ॲन सी यंग हिला अग्र मानांकन देण्यात आले आहे. महिला एकेरीमध्ये जपानची विश्वविजेता खेळाडू अकाने यामागुची हिला दुसरे मानांकन देण्यात आले आहे. तसेच चीनची वँग झी यी ही तिसऱ्या व चेन युफेई ही चौथ्या स्थानावर आहे. पुरुष दुहेरीमध्ये किम हो-सिओ जेई या दक्षिण कोरियाच्या जोडीला प्रथम मानांकन देण्यात आले आहे.

नव्या गुणपद्धतीचा फटका बसणार

नवी दिल्ली, ता. ४ : आंतरराष्ट्रीय बॅडमिंटनमध्ये पुढील वर्षापासून (२०२७) नव्या गुणपद्धतीचा अवलंब होणार आहे. याअंतर्गत २१ गुणांच्या तीन गेमऐवजी आता १५ गुणांचे तीन गेम अशी नवी गुणपद्धती लागू होणार आहे. याबाबत भारताचे माजी बॅडमिंटनपटू व प्रशिक्षक पुलेला गोपीचंद यांनी आपले मत व्यक्त करताना म्हटले, की या बदलाचा काही खेळाडूंना फायदा होईल, तर काही खेळाडूंना मोठा फटका बसू शकतो.

पुलेला गोपीचंद यांनी पुढे सांगितले, की २००१ मध्ये मला ऑल इंग्लंड स्पर्धेच्या जेतेपदावर नाव कोरता आले. त्यानंतर लगेच गुणपद्धतीत बदल झाला. त्या बदलाशी जुळवून घेण्यासाठी त्यांना जवळपास एक वर्ष लागले.